निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६२ वा.
बुधवार :२६ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# धर्माधिष्ठीत समाजनिर्मितीत संतांचे योगदान- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस









**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** आपल्या देशा-ला सनातन संस्कृतीची परंपरा आहे. या परंपरेतील धर्माधिष्ठीत समाजनिर्मितीत व राष्ट्राच्या उभारणीत संतांचे मोठे योगदान आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेरुळ येथे केले.

संत जनार्दनस्वामी यांच्या वेरुळ येथील आश्रमात ॐ जगद्गुरू जनशांती धर्म सोहळा सुरु आहे. या सोहळ्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज भेट दिली. संत शांतीगिरी महाराज हे त्यांचे समवेत उपस्थित होते. यावेळी आ. संजय केणेकर, आ. प्रशांत बंब, सुरेश चव्हाणके आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ७५१ कुंड यज्ञशाळा प्रवेश सोहळा तसेच भगवान शिव मूर्तिचे पूजन व उदघाट्न करण्यात आले. कार्यक्रम स्थळी येताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित संत महंत यांच्यावर पुष्पवृष्टी केली. त्यानंतर संत नागेश्वरानंद आणि संत अवीमुक्तेश्वरानंद स्वामी यांनी फडणवीस यांचे स्वागत केले.

आपल्या संबोधनात श्री. फडणवीस म्हणाले की, संत शांतीगिरी महाराजांच्या एका अनुग्रहाने लाखो लोकांचे जीवन बदलले आहे.संतांच्या शिकवणीमुळे आपली संस्कृती, धर्म प्रचाराचे कार्य सुरु आहे. देशात शांती स्थापन करुन आपला देश प्रगतीपथावर नेण्याचे कार्य पुर्णत्वास नेण्याचे सामर्थ्य या संतांच्या आशिर्वादात आहे. धर्माधिष्ठीत समाज निर्मितीसाठी व अशा समाजाद्वारे राष्ट्र उभारणीत संतांचे मोठे योगदान आहे,असे त्यांनी सांगितले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील वाहनाने गंभीर जखमी झालेल्या सौ.कुसुम सुदे यांचा मृत्यू

**आत्ताच एक्सप्रेस**
**किल्ले धारूर/प्रतिनीधी/**धारूर तालुक्यातील धुनकवड पाटी जवळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्निशामक वाहनाने दुचाकीवरून जाणाऱ्या विष्णू सुदे यांच्या दुचाकीला जोराचे धडक दिली होती. या अपघातामध्ये पती-पत्नी व कुटुंबातील दोन्ही मुली जखमी झाल्या होत्या गंभीर जखमी झालेल्या सौ कुसुम सूदे यांचा दुर्दैव मृत्यू आज झाला आहे.

शनिवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ताफा धारूर कडे जात असताना येथील धूनकवड पाटीजवळ ताफ्यातील अग्निशामक गाडी व दुचाकी यांचा अपघात झाला होता या अपघातामध्ये विष्णू सुदे त्यांच्या पत्नी कुसुम सुदे दोन मुली रागिनी व अक्षरा या जखमी झाल्या होत्या विष्णू सुदे व त्यांच्या पत्नी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती त्यांच्यावर धारूर ग्रामीण रुग्णालयामध्ये प्राथमिक उपचार करून अंबाजोगाई येथे पाठवण्यात आले होते. परिस्थिती गंभीर







असल्याने अंबाजोगाई वरून ही लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले त्या ठिकाणी उप-चार सुरू असतानाच सौ कुसुम सुदे यांची प्राणज्योत मालवली आहे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे त्यांच्यावर आज दिंद्रुड येथील मोहखेड रोडवरील राहत्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या या दुर्दैवी मृत्यूमुळे धारूर तालुक्यात सर्व हळहळ व्यक्त केली जात आहे. सुदे कुटुंबावर हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विष्णू सुदे आणखीही बेशुद्ध अवस्थेत आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथील रुबी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांच्या मदतीला आता महाविस्तार ॲप मातीपासून मार्केटपर्यंत आता सगळं काही एका ठिकाणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** शेतकऱ्यांना हवामानातील बदल, बाजारपेठेतील अस्थिरता आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा ला-गतो. यावर उपाय म्हणून कृषी विभागाने 'महाविस्तार' हे एआय प्रणालीवर आधारित ॲप विकसित केले आहे. पवर शेतकऱ्यांसाठी मराठी माषेतील चॅटबॉट देण्यात आला असून या चॅटबॉटला शेतकरी प्रश्न विचारू शकतात, त्याची उत्तरे चॅटबॉट काही सेकंदात शेतकऱ्याऱ्यांना देतो. मातीप-ासून मार्केटपर्यंत आता सगळं काही एका ठिकाणी महाविस्तार पच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे विभागातील सर्व शेतकरी बांधवांनी महाविस्तार ॲप त्रेस-श्रश झश्रू डींश मधून इन्स्टॉल करून वापर करण्याचे आव-ाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

प चालविण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य आहे. फार्मर आयडी नसल्यास ॲप वापरता येणार नाही. फार्मर आयडीत शेतकऱ्याचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, आधार क्रमांक व बँक खाते, जमिनाचा सातबारा उत-ारा, शेतीचे क्षेत्रफळ व पिकांची माहिती, शेतकऱ्याने घेतलेले कर्ज किंवा विमा योजना आदीच्या नोंदी केल्या आहे.

महाविस्तार चॅटबॉट कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित संगणकीय प्रणाली आहे. यात मजकुराद्वारे किंवा आवाजाद्वारे संवाद करण्याची क्षमता विकसित करण्यात आली आहे. चॅटबॉटचा उपयोग विविध सेवांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मदत करण्यासाठी किंवा विशिष्ट काम पूर्ण करण्यासाठी केला जातो.

कृषी विभागाने विकसित केलेले महाविस्तार एआय आधारित डिजिटल सल्लागार ॲप आहे. हे ॲप शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित सर्वसमावेशक माहिती आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी मिळावे यासाठी 'वन स्टॉप सोल्यूशन' म्हणून काम करते.

हवामान बदलाच्या संकटामुळे शेतकऱ्यांसमोर नवनवीन आव्हाने निर्माण होऊ लागली आहेत, त्यामुळे हवामान बदलांना तोंड देण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा पर्याय उपयुक्त ठरू शकतो, छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर- ११४२३, जालना-१५११३ व बीड- ५९८९ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या ॲपचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाची कास धरली आहे.

शेतकऱ्यांसाठी डिजिटल सल्लागार म्हणून महत्व-ाची भूमिका बजावत अस-लेले महाविस्तार -ख आधारित ॲप शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरू लागले आहे, महाविस्तार ॲपमध्ये हवामान अंदाज, शे-तीतील लागवड, लागवडीची पद्धत, कीड व्यवस्थापन, कीड व्यवस्थापनाच्या पद्धती, बाजारभाव, पीक व्यवस्थापन, खतांचा वापर, पीक सल्ला, मृदा आरोग्य, गोदाम व्यवस्था आणि डीबीटीवरील योजनांची माहिती ॲपवर मिळते, असेही कृषी विभागाने कळविले आहे.

## राज्यातील विद्यापीठांना राष्ट्रीय, जागतिक स्तरावर अग्रस्थानी आणावे - मंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई/** महाराष्ट्रातील विद्यापीठांनी नॅशनल इन्स्टिट्यूशनल रॅंकिंग फ्रेमवर्क रॅंकिंग सुधारण्यासाठी अधिक प्रयत्नशील राहण्यावर भर द्यावा. राज्यातील विद्यापीठे राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर अग्रस्थानी आणण्यासाठी सर्व विद्यापीठांनी प्रयत्न करावेत,असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिले.

आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवणारी संशोधन प्रकाशित करणे, तसेच नॅक (एनएएसी) मानांकन सुधारण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्दे श मंत्री पाटील यांनी दिले.

बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण



मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील विद्यापीठांचे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय मानांकन उंचावणे आणि राज्यस्तरीय एसआयआरएफ पोर्टल विकसित करण्यासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठक झाली.

राज्यातील विद्यापीठांनी एनआयआरएफ तसेच जागतिक रॅंकिंगमध्ये उंच भरारी घेण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर यावेळी चर्चा झाली. विद्यापीठांनी संशोधनाची गुणवत्ता वाढवणे, विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढवणे, दर्जेदार शिक्षण देणे, संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसचिव संतोष खोरगडे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) मुंबईचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## भटक्या कुत्र्यांना वाटेल तिथे खावू घालणाऱ्यांना दणका; महाराष्ट्रात नवा नियम लागू...

भटक्या कुत्र्यांकडून लहान मुले, नागरिकांवर होणारे हल्ले तसेच त्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. यापुढे भटक्या कुत्र्यांना मोकळ्या जागेत खायला दिल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्याचप्रमाणे अशा कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण अनिवार्य केले असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.





**भटक्या कुत्र्यांना खायला देण्याचा नवा नियम काय?**

राज्य शासनाने सर्व महापालिका/ नगरपालिका/नगर पंचायतींनी प्रत्येक नागरी भागात कुत्र्यांना पकडण्यासाठी नियमित मोहीम, त्यांचे निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरण अनिवार्य करण्यात आलं आहे. तसेच ज्या भागात कुत्र्यांचे पुनर्वसन किंवा सोडले जाईल तेथील संपूर्ण नोंद ठेवणे बंधनकारक केले आहे. तसेच त्यांच्या खाण्याच्या जागा निश्चित करून त्याच ठिकाणी खायला देण्यात यावे. याची खातरजमा करण्यात यावी तसेच मोकळ्या ठिकाणी खायला देणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्याचेही आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत.

**लसीचा पुरेसा साठा ठेवण्याचे आदेश**

जखमी होणाऱ्या नागरिकांना भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात उपचार सुविधा मिळावी यासाठी रुग्णालयांमध्ये 'अँटी रेबीज' लस व 'इम्युनोग्लोब्युलिन'चा साठा अनिवार्य करण्यात आला आहे. सर्व सरकारी रुग्णालयांना पुरेसा साठा ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**महाराष्ट्रातील या शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांची समस्या गंभीर**

महाराष्ट्रातील भटक्या कुत्र्यांची समस्या अत्यंत गंभीर आहे. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांमध्ये सर्वाधिक संख्या आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वा-तावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही वर्षांत ही समस्या वाढतच चालली आहे, विशेषतः शहरांमध्ये जसे मुंबई, पुणे, ना-गपूर आणि संभाजीनगरमध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे.

**महाराष्ट्रात १०० जणांचा कुत्रा चावल्याने मृत्यू**

महाराष्ट्रात २०२२ ते २०२४ या काळात १३.५ लाख कुत्र्यांच्या चावण्याच्या घटना नोंदवल्या गेल्या, जी देशातील सर्वाधिक आहे. २०१९ ते २०२३ या चार वर्षांत राज्यात २५ लाखांहून अधिक चावण्याच्या घटना घडल्या, ज्यात १०० जणांचा मृत्यू झाला. ग्रामीण भागात गेल्या वर्षभरात ७ लाख लोकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घे-तला.

**मुंबईमधील आकडेवारी काय सांगते?**

मुंबईत जानेवारी ते ऑगस्ट २०२५ या आठ महिन्यांत १०,७७८ तक्रारी नोंदवल्या गेल्या. नागपूरमध्ये २०२५ च्या पहिल्या सात महिन्यांत ६,०५६ चावण्याच्या घटना घडल्या, ज्यात १,०८५ गंभीर जखमी झाले, आणि गेल्या चार वर्षांत ६२% वाढ झाली. पुण्यात २०२२ पासून १ लाख चावण्याच्या घटना नोंदवल्या गेल्या. सांगली महापालिका क्षेत्रात २५ हजारांहून अधिक भटकी कुत्री आहेत.

# संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ...

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७६ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांना एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान.

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.

ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला.

संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

# जागल्यांचा दिपस्तंभ ..चंद्रकांत पाटणकर






मराठी वुत्तपत्र लेखक संघ मुंबई म्हणजे वर्तमानपत्रातून संपादकीय पानावर निर्भीडपणे आणि पदरमोड करून पत्रे लिहिणाऱ्या सर्व वृत्तपत्र लेखकांचे विद्यापीठ होय. या विद्यापीठात आम्ही दर शनिवारी संध्याकाळी मुक्तचिंतन, अभ्यास शिबीर, वेगवेगळ्या स्पर्धा किंवा एखाद्या संभाव्य कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यासाठी गेली ५० वर्षे अनेकजण भेटत असतो. या विद्यापीठात समरस झालेला कार्यकर्ता लेखनात किंवा सामाजिक कार्यात दिवसेंदिवस परिपक्व होत जातो याची संस्थेच्या चळवळीच्या ७५ वर्षाच्या इतिहासाच्या वाटचालीत शेकडो उदाहरणे सापडतील. साधारण १९९० च्या दरम्यान पाटणकरांची आणि माझी ओळख झाली, ही पहिली भेट पुढे घट्ट मैत्रीत, बंधुत्वात रूपांतरित कधी झाली हे कळलेच नाही. योगायोगाने का होईना पाटणकर यांच्याशी विचारांची देवाणघेवाण घडली, संवाद, स्नेहबंध टिकला वारंवार होणाऱ्या भेटी, दूरध्वनीवरील संवाद यामुळे आमचा स्नेहबंध अधिक दृढ झाला. अंगी स्पष्टपणा,निर्भीड, दिलदार,प्रेमळ मनाचे, एक ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक आणि एक ज्येष्ठ कडवट शिवसैनिक म्हणजेच चंद्रकांत वामनराव पाटणकर ! २९ नोव्हेंबर २०२५ ला त्यांचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत असताना पाटणकर यांचे माझी पत्रपंढरी भाग तिसरा गौरव ग्रंथ म्हणून प्रकाशित होत आहे. आयुष्याच्या ७५ वर्षात वाटचालीत ५२ वर्षे त्यांनी समाजासाठी दिली आहेत. आपण किती वर्ष जगलो ! याचे मोजमाप करताना,कसे जगलो ? आणि कुणासाठी जगलो ? प्रत्येकाचे मूल्यांकन यानिमित्ताने समाज करीत असतो. ३५ वर्षे पाटणकर साहेबांच्या सहवासात मी व्यतित केलेल्या क्षणांचा मागोवा घेताना प्रामुख्याने एक लक्षात आले ते म्हणजे हा माणूस समाजासाठी ७० टक्के जगला आहे. मितभाषी परंतु मोजकेच आणि आवश्यक बोलणारे, परखड आणि मुद्देसूद भूमिका मांडणारे, निर्भीडपणे सातत्याने अभ्यासपूर्ण वर्तमानपत्रातून पत्रे लिहिणारे आणि संस्थेसाठी स्वतःची मूठ सतत मोकळी करणारे असेच त्यांचे व्यक्तिमत्व माझ्या आणि माझ्या इतर सहकाऱ्यांच्या मनात कोरलेले आहे. मराठी माणूस व्यवसाय करू शकत नाही, केला तर तो फार पुढे जाऊ शकत नाही, अशी बोंबाबोंब करणाऱ्यांनी चंद्रकांत पाटणकर यांचे वडील स्व. वामनराव आणि चंद्रकांत पाटणकर यांचा व्यवसाय आणि चरित्र त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त समजून घ्यावे लागेल. अर्थात चंद्रकांत पाटणकर यांना मुळातच अन्याय-अत्याचाराची चीड असल्याने लढवय्या व धाडसी स्वभावाचे समाजसुधारक म्हणूनच त्यांची जडणघडण संस्कारक्षम वयातच झाली. सामाजिक विषमतेविरुद्ध अनेक विषयावर लेखन करणारे निर्भीड व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती आहे. आपला वडिलोपार्जित व्यवसाय सचोटीने चालवताना पाटणकरांनी व्यावहारिकदृष्ट्या उच्च शिक्षण घेऊनही एक सामान्य मनुष्य म्हणून तत्त्वनिष्ठा, कर्मनिष्ठा, जिद्द, चिकाटी, प्रखर बुद्धिमत्ता आणि ज्वलंत आत्मविश्वास आणि साहसी स्वभाव यांच्या जोरावर आयुष्यात किती पुढे जाऊ शकतो, एवढेच नव्हे तर समाजाचे आपण काही देणे लागतो ही कृतज्ञ भावना पाटणकरांनी आयुष्यभर जोपासली.

वृत्तपत्र लेखकाला लेखनासाठी दररोजच्या वर्तमानपत्रांसह इतरही अवांतर वाचन करावे लागते. हे वाचन करताना समाजाच्या व्यथा वेदना बातमीत आणि रोजच्या जीवनात शोधाव्या लागतात. हाती घेतलेल्या विषयाचा अभ्यास करून तो नेमक्या शब्दात मांडायचा आणि तडीस नेण्यासाठी सबधितांच्याकडे त्याचा निर्णय होईपर्यंत गप्प न बसता पाठपुरावा करायचा हा पाटणकरांचा खाक्या. आपल्या कार्यशैलीने पाटणकरांनी लेखणीद्वारे अनेक समस्यांना वाचा फोडून न्याय मिळवून दिला आहे.

दादर- माहीम म्हणजे मराठी माणसांचा बुलंद आवाज. अत्रे, ठाकरे, डांगे, बापट या माणसांची ही कर्मभूमी. देदीप्यमान इतिहास घडवणाऱ्या या महान विभुतींचा आवाज, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे पोवाडे वयाच्या पंधरा-सोळा वर्षांपासूनच शिवाजी पार्क भागात चंद्रकांत पाटणकर यांनी अनेकदा ऐकले होते. त्यामुळे कायम अस्वस्थ असलेले त्यांचे मन समाजसेवेसाठी तयार होत गेले. चार अक्षरी शिवसेना, पाच अक्षरी बाळासाहेब, सहा अक्षरी मराठी माणूस हे ध्येयवादी असलेले विचार पाटणकर यांनी पुरेपूर आत्मसात केले आहेत. शिवसेनेची स्थापना होऊन १६ वर्षे झाली होती. चंद्रकांत पाटणकर ऐन उमेदीत असताना शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या रोखठोक विचारांनी, रांगड्या भाषेने आणि महत्त्वाचे म्हणजे ' 'मऱ्हाटी बाणा', 'मऱ्हाटी अस्मिता' चेतवणाऱ्या त्यांच्या प्रखर वक्तृत्वाने लक्षावधी तरुण शिवसेनेकडे आकृष्ट झाले होते, त्यातले एक म्हणजे आपले चंद्रकांत पाटणकर ! पाटणकर तरुण वयात नव्हे, तर चक्क बालवयातच शिवसेनेशी जोडले गेले होते. कुणीही न सांगता दादर- माहीम- माटुंगा विभागातील प्रत्येक घराघरात शिवसेना पोहोचविण्याठी, गेल्या ६० वर्षात झालेल्या प्रत्येक निवडणुकीत शिवसेनेचा लोकप्रतिनिधी निवडून आणण्यासाठी, तो खासदार-आमदार-नगरसेवक निवडून आल्यानंतर लोकांचे प्रश्न घेऊन सोडविण्यासाठी वा वर्तमानपत्रातून प्रकाशित झालेले आपल्या पत्राची झेरॉक्स घेऊन त्यांच्यापर्यंत जाणे, आंदोलन करताना आपण जखमी होऊ किंवा आपल्यावर पोलीस केस होईल याची तमा न बाळगता शिवसेनेच्या झालेल्या प्रत्येक आंदोलनात सहभागी होणे या सर्वांमध्ये पाटणकर अग्रभागी होते. त्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे मुंबईतील ज्या शिवसैनिकांना नावाने ओळखत असत त्यात माहिमचा तरुण चंदू हा शिवसैनिक होता. एवढ्या राजकीय उलथापालथी, कमालीची स्थित्यंतरे होऊनही मूळ शिवसेनेबरोबर राहिली आहेत ! केवढी ही तत्त्वनिष्ठा ! केवढे हे शिवसेनेवरचे प्रेम ! असे शिवसैनिक जोपर्यंत शिवसेनेकडे आहेत, तोपर्यंत या महान संघटनेला सोन्याचे दिवस आहेत, यात काही शंका नाही. चंद्रकांत पाटणकर यांनी शिवसेना आत्मसात केल्यापासून पडद्याआड राहून कोणत्याही पदाची अभिलाषा न धरता प्रसंगी आलेली संधी नाकारून एक सामान्य शिवसैनिक म्हणून संघटनेसाठी सातत्याने निष्ठेने आजपर्यंत काम केले. पाटणकर यांची मानवसेवेची तळमळ पाहून आजवर अनेक जण प्रभावित झाले आहेत, अनेक संस्थानी त्यांच्या परखड लेखनाची, दातृत्वाची, समाजसेवेची दखल घेऊन सन्मामाने पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे. नजरेत आत्मविश्वास, मनात ध्येय आणि ओठात प्रेमाचा गोडवा असला की, यशाची हिमशिखरे साद घालतात हेच त्यांच्या यशस्वी वाटचालीचे गमक आहे. परिस्थितीशी झगडून पुढे आलेली माणसे नेहमी जपली पाहिजेत. कारण जीवनाचे तत्त्वज्ञान ही माणसे नुसती शिकलेली असे नव्हे तर जगलेलीही असतात. पाटणकर आज वयाचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहेत. वाढते वय सोडले तर प्रकृती उत्तम आहे. त्यांच्या पत्नीचे अबाधित सहकार्य हे त्यांच्या यशाचे मुख्य कारण आहे हे ते स्वतः नेहमी सांगतात. दोन विवाहित मुली, जावई, मुलगा, सून आणि नातवंडे हा प्रेमळ परिवार त्यांच्या भोवती आहे. आज त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान म्हणजे खऱ्या आयुष्याचे यश. पूर्वी 'सुखी माणसाचा सदरा' ही गोष्ट आपण वाचली असेलच. पण मला वाटते, असा समाधानी आणि सेवाभावी माणूस जवळ असणे, त्याच्याशी संवाद साधणे हेच आजच्या काळातील भाग्य आहे. पाटणकरांनी बेधडक लिहिले आणि त्याचा पाठपुरावाही त्याच ताकदीने केला, माहीम येथील टँकर पाणी चोरी, माहीम किल्ल्याची दुरावस्था, त्रंबकेश्वर देणगी प्रकरण याची दखल संबंधित यंत्रणांनी घेतली होती. मानवाच्या जीवनात अमृतमहोत्सव म्हणजेच ७५ वर्षे पूर्ण होणे, हा केवळ कालगणनेतील एक ठराविक टप्पा नसतो. तो असतो अनुभवांचा, विचारांचा, कर्तृत्वाचा आणि समाजाशी जोडलेल्या नात्यांचा अमृतकाळ.यानिमित्ताने पाटणकर यांना मनापासून शुभेच्छा ! त्यांची ही अविरत दमदार वाटचाल अशीच पुढील आयुष्यात निर्विघ्न आरोग्यमयी व्हावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. त्यांच्या हातातील लेखणीतून उत्तरोत्तर समाजप्रबोधनात्मक लेखन प्रसिद्ध होवो.

**- रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**

# जगाला पर्यावरण संरक्षणाची नितांत गरज.....

जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे.याकरीता जगाने पर्यावरण वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनीशी पर्यावरणाचे संतुलन ठेवुन संरक्षण करण्याची गरज आहे. वाढते प्रदुषण रोखण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तरावर आणि राजनीतीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता संयुक्त राष्ट्राने २६ नोव्हेंबर १९९२ला विश्र्व पर्यावरण संरक्षण दीवस साजरा करण्याची सुरुवात केली.त्यामुळे संपूर्ण जगात २६ नोव्हेंबर विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावे असे सर्वांना वाटते.परंतु जगातील मानवांच्या अतीरेकामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड, खणन, नदीतील रेती खणन,त्याचप्रमाणे सोने,धातु,चांदी,हिरे, कोळसा व खनिज संपत्ती इत्यादीवर मानवाने सरळ घणाघाती प्रहार करून निसर्गाच्या मुळावरच मानवाने कुह्राड मारून मोठा घाव केल्याचे दिसून येते.यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. पर्यावरणाची ढासळती परीस्थिती पहाता पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवजाती व जीव-जंतु भयभित झाल्याचे दिसून येते.त्यामुळे आज जगाला पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे.भारतात जंगल, पशु-पक्षी व प्राणी यांना सरकारकडुन संरक्षण मिळावे यासाठी २६ मार्च १९७४ ला गढवाल मधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखाली चिपको आंदोलनास सुरूवात झाली व पर्यावरण संरक्षणाची मिसाल जागृत केली.आज तसे पाहिले तर स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे दिसून येते. मानवाने जर पर्यावरणाला वाचविले तर जलप्रदूषण, वायुप्रदूषण व स्थल प्रदुषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरपूर मदत मिळु शकते.आज पर्यावरणात इतके प्रदुषण दीसुन येते की पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे. याचाच परीणाम पर्यावनावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो. भारतासह जगातील वाढती लोकसंख्या हीच पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण असल्याचे मी समजतो. मानवाने आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.आज पर्यावरणावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की जगावं की मरावं कारण आज पर्यावरणाचा आधारस्तंभ वृक्षआहे व त्याला साथ हवी जल व वायूची परंतु हे संपूर्ण दुषित झाल्यामुळे पर्यावरण धोकादायक स्थितीत येवून पोहाचले आहे.असेही सांगण्यात येते की पर्यावरणाच्या ढासळत्या परिस्थितीमुळे जगातील १० लाख प्राणी व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ज्या पक्ष्यांवर पर्यावरणाची धुरा आहे ते गिधाड पक्षी सुध्दा संपुष्टात येत आहे.मानवाने निसर्गावर एवढा अत्याचार केला की वृक्ष कटाईच केली नाही तर वृक्षांना जळामुळा सकट उपडुन फेकले.यामुळेच आज पर्यावरण मानवापासुन भयभीत झाले आहे. आज औषधोपयोगी वनस्पती पर्यावरणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे नस्तनाबुत होत आहे.त्याचप्रमाणे अनेक औषधोपयोगी वनस्पती लुप्त झाल्या आहेत.जगातील वाढत्या प्रदूषणामुळे ३० टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील १४२ प्रजाती आधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत ही अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.भारतात वृक्षांच्या २६०३ प्रजाती आहेत यातील ४६९ प्रजाती धोकादायक स्थितीत आहेत म्हणजेच भारतातही गंभीर समस्या आहे.आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणी शहरात व गावात प्रवेश करतांना दिसतात यामुळे जिवीत हाणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.यात हिंसक प्राणी शहरात व गावात प्रवेश करून मानव हानी व पाळीव प्राण्यांची हानी मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.

यामुळे जंगली प्राणी व मानव यांच्यात मोठ्या प्रमाणात शत्रुत्व दिसून येते.कारण जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळे जंगलात रहाणारे पशु-पक्षी यांचे खान-पान ऐकामेकांवर अवलंबून असते.परंतु जंगल तोडीमुळे अनेक प्राण्यांच्या व पक्षांच्या प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते किंवा पर्यावणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे मृत्यूशी झुंज देतांना अनेक पशु-पक्षी दीसतात.त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रथम जबाबदारी मानवजातीची आहे ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.आज प्लास्टीकनेसुध्दा पर्यावरणाला प्रदुषीत केल्याचे दिसून येते.मानवाने स्वत:च्या स्वर्थासाठी पर्यावरणाचे जनुकाय संपूर्ण रक्त पिवुन निचोडुन ठेवल्याचे दीसुन येते.आज जगात विश्र्व शांतीसाठी पर्यावण वाचवीण्याची गरज आहे. आज मानवजातींमध्ये वाढणाऱ्या बिमाऱ्या,अनेक व्याधी व आरोग्याची ढासळती परिस्थिती ह्या सर्व पर्यावरणाच्या बिघडत्या संतुलनामुळे दिसून येतात.

यामुळे आज मानवाचे आयुष्यमान दिवसेंदिवस कमी होतांना दिसून येते. पशुपक्षांचेतर जगने अत्यंत कठीण झाले आहे.जगात वाढते कारखाने आणि जगातील युध्दसामुग्रीची शर्यत व अनेक परमाणु परिक्षण यामुळे संपूर्ण जग प्रदुषीत होतांना दिसते. आज भारतातील जिवंत उदाहरण म्हणजे भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असल्याचे सांगितले जाते.याचाच अर्थ असा की दील्ली आज प्रदुषणाच्याबाबतीत महाभयानक परीस्थिती असल्याचे दिसून येते.आज प्रदुषणामुळे दिल्ली गॅसचेंबर बनले की काय असे वाटत आहे.या महाभयानक परीस्थितीत दील्लीवासी मास्क चा मोठ्या प्रमाणात वापर करतांना दिसतात.

यामुळे असे वाटते की दील्लीमध्ये मास्क युग आले की काय असे वाटत आहे. संयुक्त राष्ट्राने १९९२ ला पर्यावरण संरक्षण करण्याची संकल्पना जाहीर केली होती.परंतु याबद्दल कीती देश अलर्ट, सतर्क व सजन आहे हे पहाने गरजेचे आहे. पर्यावरण संरक्षण करण्याची घोषणा करणे वेगळे आहे.परंतु त्याला कृतित कोणता देश रूपांतरित करतो त्याला जास्त महत्त्व आहे. कारण आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.याचे उदाहरण म्हणजे अझरबैजान-आर्मेनिया युद्ध आणि गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता सुरू असलेले हमास-हिजबुल्ला विरूद्ध इस्रायलचे भयावह युद्ध. त्यामुळे मानवजातीने आपल्या मृत्यूचीही व्यवस्था केल्याचे दिसून येते.मानवजातीने आता पर्यावरण वाचवीले नाही तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला पाहिजे.

आज पर्यावरण संरक्षणा करीता लोकसंख्येवर नियंत्रण असने गरजेचे आहे, वाढते शहरीकरण थांबवीले पाहिजे, कारखान्यांतील धुळ व दुषीत पाणी यांचा बंदोबस्त केला पाहिजे,भारतासह जगात अनेक वाहन दुषीत धुर ओकत असतात ते कुठेतरी थांबवीले पाहिजे.आज पर्यावरण विस्कळीत झाल्यामुळे व प्रदुषणामुळे मानवजातीच्या आरोग्यावर संकट ओढावले आहे यात कॅन्सर, टीबी, मधुमेह,हार्ड अटॅक, डोळ्यांचा त्रास इत्यादीसह अनेक व्याधी मोठ्या प्रमाणात दीसुन येतात.आज भारत प्रगतीपथावर आहे.परंतु पर्यावरणाच्या बाबतीत मागे असल्याचे दिसून येते.याचे जीवंत उदाहरण म्हणजेदील्लीतील प्रदुषण. त्यामुळे भारताने मुख्यत्वे करून पर्यावरण संरक्षणासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची गरज आहे. गेल्या ५ ते १० वर्षांपासून जगात अनेक महाप्रलय, मोठ्या प्रमाणात सुनामी,ग्लेशीअर वितळने,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागुन मोठ-मोठे जंगल संपदा जळुन खाक होने,भुकंप येणे, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने व पर्यावरणाची खुली हत्या केल्याने ह्या घटना घडत असल्याचे स्पष्ट दीसुन येते.त्यामुळे आज पर्यावरणाला वाचविण्याकरिता जगातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

भारतात शहरांचे सौंदर्यकरन करण्याच्या उद्देशाने जंगल तोड करने बरोबर नाही.त्यामुळे भारत सरकारने जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे.यामुळे पर्यावण शुद्ध राहिल. पर्यावरन संरक्षण दिनाच्या निमित्ताने मी सरकारला एकच आव्हान करतो की जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे व ओसाड जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जनतेला मी एकच आव्हा करतो की २६ नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दीवसाचे औचित्य साधून या दीवशी प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावावे व पर्यावरणाचे संरक्षण करावे ही आग्रहाची विनंती आहे.त्याचप्रमाणे सरकारने घर तीथे झाड ही मोहीम राबविली पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा,पक्षांना आणि मानवाला फळ व सर्वांना सावली आणि ऑक्सिजन मिळेलयांच्या संगमाने शुध्द हवा मिळुन पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होईल.आज संपूर्ण जगाला पर्यावरण वाचवीण्याची हीच संधी आहे.ही संधी गमावून नये असे मला वाटते.आज पर्यावरण प्रदुषीत झाल्यामुळे नदी,नाले,तलाव, समुद्र प्रदुषित झाले आहे.

यामुळे जलचर प्राण्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी विश्र्वातील संपूर्ण मानवजातीवर आहे त्या अनुषंगाने सर्वांनी पावुले उचलली पाहिजे.पर्यावरण सुरक्षीत तर पृथ्वी सुरक्षित,पृथ्वी सुरक्षित मानव, पशु-पक्षी सुरक्षित हेच धेय्य पुढे ठेवून पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे.आजच्या अत्याधुनिक युगात मोबाईल टॉवर मोठ्या प्रमाणात दीसुन येते यामुळेसुध्दा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.यावरसुध्दा नियंत्रण आणन्याची गरज आहे. साडे तिनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराजांनी निसर्गाचे, पर्यावरणाचे आणि झाडांचे महत्व आपल्या अभंगातून सांगितले होते आणि त्याचे आज अनुकरण होण्याची गरज आहे.

वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे ! पक्षी सुस्वरे ! आळविता !! येणे सुख रूचे एकांताचा वास ! नाही गुणदोष ! अंगीयेता !!

**-लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**

## संक्षिप्त

### महार वतनाच्या जमिनी मूळ मालकांच्या वारसांना परत करण्याची रिपब्लिकन सेनेची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर / प्रतिनिधी /सुभान शहा/** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर, कन्नड आणि खुलताबाद तालुक्यातील महार वतनाच्या जमिनी त्यांच्या मूळ मालकांच्या वारसांना परत करण्यात याव्यात, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, तत्कालीन निजाम शासनाकडून महार वतन हाडोळे यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने इनाम स्वरूपात या जमिनी देण्यात आल्या होत्या. मात्र, भारत स्वतंत्र झाल्यानंतर या जमिनी सरकारने ताब्यात घेऊन पुन्हा वाटप केल्या. त्यानंतर या जमिनींच्या खरेदी–विक्रीचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले.

परंतु कालांतराने काही प्रस्थापितांनी नियमांकडे दुर्लक्ष करून आणि मूळ मालकांच्या अज्ञानाचा फायदा घेत या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्या. संबंधितांनी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी किंवा आवश्यक शासकीय चलन भरपाईही केली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तत्कालीन अधिकाऱ्यांनी कोणतीही प्रशासनिक परवानगी न घेता सातबारा उताऱ्यांमध्ये केलेले फेरबदल रद्द करून, या जमिनी मूळ मालकांच्या वारसांना परत करण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनात केली आहे.

या निवेदनावर मिलिंद बनसोडे (मराठवाडा अध्यक्ष), विजय शिंदे (उपाध्यक्ष), बबन साठे (जिल्हा महासचिव, पश्चिम), अजय बनसोडे (शहर प्रसिद्धी प्रमुख, छ. संभाजीनगर), सुनील पांडे (जिल्हा प्रवक्ता), नाना सूर्यवंशी (माजी युवा जिल्हाध्यक्ष), योगेश दाणे (जिल्हा संघटक), लखन थोरात (उपाध्यक्ष, गंगापूर), कुंदन मोरे (ता. सचिव, पश्चिम, छ. संभाजीनगर), शेषराव दाणे (ज्येष्ठ नेते)** यांसह इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## दशसूत्री उपक्रमांतर्गत जिल्ह्यात एकाच वेळी १९२० शाळांमध्ये पालक सभा

# चांगले नागरिक घडविण्यासाठी संस्कार आवश्यक–जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** संस्कारक्षम व गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्यासाठी जिल्ह्यात सुरु असलेल्या दशसूत्री उपक्रमांतर्गत





आज जिल्ह्यात एकाच वेळी १९२० शाळांमध्ये पालक सभांचे आयोजन करण्यात आले. आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत. चांगले नागरिक घडविण्यासाठी त्यांचा सर्वांगिण विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षणासोबत त्यांच्यावर संस्कार रुजविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

गाडीवाट केंद्र कचनेर ता. छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजीत पालक सभेस आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी स्वतः उपस्थित होते. दशसूत्री उपक्रमांतर्गत आज जिल्ह्यात सर्वत्र पालक सभांचे आयोजन करण्यात आले.

जिल्हाभरात १९२० शाळांमध्ये हा कार्यक्रम आज पार पडला. जिल्ह्यात दशसूत्री हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना संस्कारक्षम, आरोग्यक्षम, कौशल्य क्षम, स्पर्धा क्षम विद्यार्थी घडविण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होणे अपेक्षित असून त्याद्वारे शैक्षणिक गुणवत्तेसोबतच अन्य संस्कार जसे संतसाहित्य वाचन, पौष्टिक आहाराबाबत जागृती, क्रीडा कौशल्य, ज्येष्ठांचा आदर यासारख्या अनेक बाबी शिकविल्या जात आहेत. या उपक्रमात पालकांचा सहभाग आवश्यक असून त्यासाठी या उपक्रमाबाबत पालकांना आजच्या पालकसभांद्वारे अवगत करुन त्यांचा सहभाग देण्याबाबत आवाहन करण्यात आले.

गाडीवाट येथील प्राथमिक शाळेतील पालक सभेत जिल्हाधिकारी स्वामी यांच्या समवेत सरपंच ज्ञानेश्वर भालके, तहसिलदार शिवानंद बिडवे, गट शिक्षण अधिकारी चेतन कांबळे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीराम केदार,मंडळ अधिकारी आश्विनी सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आसिफ शेख, कोळगे गुरुजी , मुख्याध्यापक प्रभाकर गायकवाड आदी उपस्थित होते,

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या वाढीसाठी आपण सगळेच प्रयत्न करीत असतो. मात्र विद्यार्थ्यांना अन्य कौशल्येही शिकवायला हवी. संत साहित्यात जीवनाविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन आहे. ते संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवायला हवे. आयुष्यात येणारे लहानमोठे अपयशाचा ते सामना करु शकले पाहिजे.

या कार्यक्रमाला गावातील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विस्तार अधिकारी श्रीराम केदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### त्रिभाषा धोरण निश्चिती समिती आज विभागात

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बुधवार दि.२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत आहे. त्रिभाषा धोरण निश्चिती समिती दि.२५ रोजी रात्री जिल्ह्यात येणार असून बुधवार दि.२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात समिती विविध घटकांना भेटणार आहे. त्यात भाषा तज्ज्ञ, साहित्यिक, शिक्षण तज्ज्ञ, बालमानस तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण संस्था चालक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रसार माध्यम प्रतिनिधी, शिक्षक– पालक संघ आदी उपस्थित राहतील. त्यांचे म्हणणे समिती जाणून घेईल. समितीचे स्वरुपः–अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य– डॉ. सदानंद मोरे, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अपर्णा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल, सदस्य सचिव संजय यादव राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा अभियान.

## सावळदबारा–देऊळगाव गुजरी रस्त्यावरील खड्ड्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सोयगाव तालुका संघटक गुलाबराव कोलते यांच्याकडून तहसीलदारांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा /प्रतिनिधी /** सावळदबारा–देऊळगाव गुजरी रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, या मार्गावरील वाढत्या वाहतुकीमुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच या परिसरातील ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषत: रात्रीच्या वेळी या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका अधिक वाढतो आहे.

या १० किलोमीटरच्या रस्त्याचा वापर सावळदबारा, देव्हारी, नांदातांडा, घाणेगाव, मोलखेडा, टिटवी, पळसखेडा, महालब्धा, पिंपळवाडी, मूर्ती अशा अनेक गावांतील नागरिक दररोज करतात. शेतमालाची वाहतूक, कामानिमित्त ये–जा करणारे कर्मचारी, विद्यार्थ्यांना शाळा–कॉलेजला जाण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र रस्ता उखडल्याने वाहनांचे नुकसान, वाढते खर्च, वेळेची नासधूस आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीविताला होणारा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सावळदबारा येथे श्री





चक्रधर स्वामी मंदिर असल्याने महाराष्ट्रासह इतर राज्यांतूनही मोठ्या संख्येने भाविक येतात. अशा धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळाकडे जाणारा मुख्य प्रवेशमार्गच खराब अवस्थेत असल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय सावळदबारामध्ये ग्रामीण बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, शाळा, महाविद्यालय, महावितरण कार्यालय, पोस्ट ऑफिस, पोलीस चौकी, पशुवैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र यांसह अनेक शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. या सर्व ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना याच मार्गाचा उपयोग करावा लागतो. या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव कोलते यांनी सोयगाव तहसील कार्यालयात तहसीलदारांना निवेदन सादर केले. रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास नागरिकांचे हाल अधिकच वाढतील, त्यामुळे तात्काळ उपाययोजना करत खड्डे बुजविण्यासाठी आवश्यक निर्देश संबंधित विभागाला द्यावेत, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदन देताना शेषराव पाटील, ताराचंद जाधव यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. या मागणीला गावकऱ्यांचा मोठा पाठिंबा असून, रस्ता त्वरित दुरुस्त व्हावा यासाठी नागरिकांमध्ये अपेक्षा वाढल्या आहेत.

## नादरपुर जिल्हा परिषद शाळेत पालक मेळावा उत्सवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम /** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील जि प्र शाळेत पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी आधुनिक युगात संगणकची अवशकता सांगताच मुलांचे अमृत कलश, आपल्या पाल्याचा भविष्याची आवड जाणून घेण्यासाठी पालकांना व विध्यार्थ्यांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले तर संगणक ज्ञानाचे महत्व विषद करत आज जगातील कोणतीही माहिती सहज आपल्याला



आपल्या मोबाईल द्वारे मिळवता येणे शक्य झाल्याचे यांनी सांगितले की शाळेत मुलांना दिलेला अभ्यास आपण घरी मुलांकडून पूर्ण करून घेतला पाहिजे मात्र काही पालक मुलांना अभ्यासाला बसवून मात्र स्वतः मोबाईल मधल्या रील बघत बसतात, अशा वेळेस मुलं वर्तन प्रिय असल्यामुळे मुलेही मोबाईल मधील फालतू रील्स बघतील अशा वेळेस मुलांना पालकांनी मोबाईल मधील महत्वपूर्ण असलेल्या अभ्यासात्मक बाबी शिकवाव्या जेणेकरून मुले मोबाईल चा गैरवापर टाळतील असे संतोष घोडके सर यांनी सांगितले.

यावेळेस शिक्षक रामहारी निकम यांचे सुद्धा विध्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन झाले.यावेळेस अध्यक्ष म्हणून भीमराव निकम होते ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष मुख्यध्यापक नरेंद्र पाटील सह नरेंद्र पाटील, श्रीराम हरी निकम सुनील जाधव जगन्नाथ कोंडके, कारभारी जंगले, पोपट जंगले, संतोष घोडके शालेय अध्यक्ष उपाध्यक्ष व्यवस्थापन सर्व सदस्य उपस्थित होते पालक या मेळावा साठी हजर होते .

### महार वतनाच्या जमिनी मूळ मालकांच्या वारसांना परत द्याव्यात – रिपब्लिकन सेनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर / प्रतिनिधी /सुभान शहा /** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर, कन्नड, खुलताबाद तसेच इतर तालुक्यांतील महार वतनाच्या जमिनी मूळ मालकांच्या वारसदारांना परत करण्यात याव्यात, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, तत्कालीन निजाम सरकारने महार वतन हाडोळे तसेच संबंधित व्यक्तींना त्यांच्या गावातील कामकाजाच्या बदल्यात या जमिनी इनामस्वरूपात देण्यात आल्या होत्या. मात्र भारत स्वतंत्र झाल्यानंतर सरकारने या जमिनींचा ताबा घेऊन त्यांचे नवीन वाटप केले.

यासोबतच या जमिनींच्या खरेदी–विक्रीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले. निवेदनानुसार, नंतरच्या काळात काही प्रस्थापित मंडळींनी नियमबाह्य मार्गाने, मूळ मालकांच्या अडाणीपणाचा फायदा घेत, परवानगी न घेता व कसलीही शासकीय चलनफेक न करता या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्या. संबंधित अधिकाऱ्यांनीही कोणतीही वैध परवानगी न घेता सातबारा उताऱ्यांवर फेरफार केले, असा आरोप करण्यात आला आहे. रिपब्लिकन सेनेच्या मागणीनुसार, अशा सर्व नियमबाह्य नोंदींची चौकशी करून त्या रद्द करण्यात याव्यात तसेच जमिनी त्यांच्या मूळ हक्कदारांना – म्हणजेच वतनधारकांच्या वारसांना – परत करण्यात याव्यात.

**या निवेदनावर खालील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत:**

मिलिंद बनसोडे – मराठवाडा अध्यक्ष,विजय शिंदे – मराठवाडा उपाध्यक्ष,बबन साठे – जिल्हा महासचिव (पश्चिम),अजय बनसोडे – शहर प्रसिद्धी प्रमुख, छ. संभाजीनगर,सुनील पांडे – जिल्हा प्रवक्ता नाना सूर्यवंशी – माजी युवा जिल्हाध्यक्ष,योगेश दाणे– जिल्हा संघटक लखन थोरात – उपाध्यक्ष, गंगापूर, कुंदन मोरे – तालुका सचिव (पश्चिम छ. संभाजीनगर), शेषराव दाणे – ज्येष्ठ नेते

## जालना शहरात श्रीराम मंदिरात महाआरती भव्यतेने संपन्न

# श्रीराम मंदिराचा सुवर्णक्षण इतिहासात अमर राहील – भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/** अयोध्येतील श्रीराम मंदिरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केशरी धर्मध्वज फडकाविण्याचा ऐतिहासिक क्षण साजरा करण्यासाठी जालना शहरातील राममंदिर, बडी सडक येथे आज दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला रामभक्त, नागरिक तसेच भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जय श्रीरामच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या वेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे प्रमुख उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की,

श्रीराम मंदिरावर केशरी धर्मध्वज फडकवला जाण्याचा दिवस हा हिंदू समाजाच्या इतिहासातील सुवर्णक्षण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रामराज्याच्या मूल्यांना नवे बळ मिळत आहे. जालना शहरातील रामभक्तांनी दाखवलेला भक्तिभाव आणि ऐक्य अभिमानास्पद आहे.

तसेच त्यांनी पुढे सांगितले की, देशाच्या सांस्कृतिक वारशाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य मोदीजी निष्ठेने करत आहेत, हे आज पुन्हा अधोरेखित झाले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन सोमेश काबलिये यांनी केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे महाआरती अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली.

कार्यक्रमाला प्रदेश निमंत्रित सदस्य विमल आगलावे , जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे , धनराज काबलिये , मंडळाध्यक्ष सुनील खरे जालना तालुकाध्यक्ष संजय डोंगर अर्जुन गेही , नगरसेवक जिवन सले , विजय पवार , सुनील राठीद , अजय भरतीया , संगीता पांजगे, देविदास देशमुख, कपिल दहेकर , जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, ममता कोंड्याल, स्नेहा जोशी, वर्षा ठाकूर , राजू गवई , कृष्णा गायके, डोंगरसिंग साबळे, कल्याण भदनेकर, रोहित नलावडे , शिवाजी राठोड आदींसह मोठ्या संख्येने रामभक्त व नागरिक उपस्थित होते.

# युवा महोत्सव-२०२५ उत्साहात संपन्न

## आत्मविश्वासाने आणि निर्धाराने केलेले कठोर परिश्रम कधीही व्यर्थ जात नाहीत - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ सध्याच्या काळात मुलींनी स्वावलंबी होणे अत्यंत गरजेचे आहे. जीवनात कोणतीही गोष्ट अशक्य नसल्याचे सांगताना प्रथम स्वप्न पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी खंबीरपणे उभे रहा, असा प्रेरणादायी संदेश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला. आत्मविश्वासाने आणि निर्धाराने केलेले कठोर परिश्रम कधीही व्यर्थ जात नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुलात **जिल्हास्तरीय युवा महोत्सव-२०२५** चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास क्रीडा अधिकारी लता लोंढे, आरती चिल्लारे, राज्य क्रीडा मार्गदर्शक आशिष जोगदंड तसेच परीक्षक म्हणून डॉ. शोभा यशवंते, डॉ. मारोती घुगे, डॉ. दिगांबर दाते आणि डॉ. कन्नुलाल पिठोरे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, यशाला शॉर्टकट नसतो. कठोर परिश्रमाला पर्याय नाही. आज केलेले कष्ट उद्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग तयार करतात.

१६ ते २४ वर्षे वयोगट हा आयुष्यातील सर्वात महत्वाचा काळ असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थिनींना सातत्य, निष्ठा आणि जिद्दीने ध्येयाकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले. काही अडचण असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात तुम्ही मला भेटायला येऊ शकता, माझ्या कार्यालयात तुमचे नेहमी स्वागत आहे, असेही त्यांनी सांगितले.




महोत्सवात तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग

**युवा महोत्सवाचा उद्देश**

युवकांमध्ये सर्वांगीण विकास साधणे भारतीय संस्कृती आणि परंपरांचे संवर्धन सुप्त कलागुणांना वाव देणे

या महोत्सवातील यशस्वी स्पर्धकांना राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळते.

महोत्सवात समूह लोकनृत्य, लोकगीत, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, विज्ञान स्पर्धा, कथालेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. १५ ते २१ वयोगटातील अनेक तरुण-तरुणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**कलाविष्कारांनी श्रोते मंत्रमुग्ध**

विकी गणेश कुलकर्णी यांनी सादर केलेले

कुंभारापरी तू भिमा समाजाला घडविले हे लोकगीत श्रोत्यांच्या मनाला भावले.

तसेच राणी उंचेगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या

कधी लागेल रे वेड्या तुला गोडी अभंगाची

या गीतातील भावनात्मक आशय, शब्दांची ताकद आणि गायनशैली यामुळे संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटात दुमदुमले.

**यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागाचे योगदान**

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष प्रसाद, अमोल मुसळे, राहुल राठोड, राहुल गायके आणि हारुण शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जालना शहर महानगर पालिका, जालना

**ई-निविदा सुचना क्र. ५८४     दिनांक २०.११.२०२५**

आयुक्त,जालना शहर महानगरपालिका, जालना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्यावर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगर पालिका, जालना कडुन (०५) कामांकरीता व्दिलिफाफा पध्दतीने, ई-१ स्वरुपात ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कालावधी दिनांक- २१/११/२०२५ स.११.०० ते दिनांक २८ /११ /२०२५ सायं. ५.०० २८/११/२०२५ सायं. ५.०० पर्यंत या वेळेत पर्यंत असुन सर्व कागदपत्रे दिनांक- २१/११/२०२५ स.११.०० ते दिनांक www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास व डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहेत, निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार महानगर पालिका, जालना यांनी राखुन ठेवले असुन अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**शहर अभियंता**
**म.न.पा.जालना.**

**स्वाक्षरीत/-**
**मुख्यलेख परिक्षक / मुख्यलेखाधिकारी**
**म.न.पा.जालना.**

**स्वाक्षरीत/-**
**आयुक्त/प्रशासक**
**म.न.पा.जालना.**

जा.क्र.२०२५ जाशमनपा/साबांवि/निविदा/ ५८४ कार्यालय महानगर पालिका, जालना.

## जालना शहरातील भटक्या जनावरांच्या मालकांवर कठोर कारवाई - जिल्हाधिकारी तसेच आयुक्त आशिमा मित्तल यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना शहरातील वाढत्या भटक्या जनावरांच्या समस्येवर नियंत्रण आणण्यासाठी जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी मनपा विभागांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत.

शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि वर्दळीच्या भागांमध्ये मोकाट फिरणारी जनावरे वाहतुकीत अडथळा निर्माण करत असून अपघाताचा धोका वाढत आहे. नागरिकांना होणाऱ्या या त्रासाची गंभीर दखल प्रशासनाने घेतली आहे.

जिल्हाधिकारी मित्तल यांनी स्पष्ट निर्देश दिले की रस्त्यावर जनावरे सोडणाऱ्या मालकांवर दंडात्मक आणि आवश्यक असल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. शहरातील स्वच्छता, सुव्यवस्था आणि सुरळीत वाहतूक राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही शिथिलता सहन केली जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. मनपा, पशुसंवर्धन विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकाद्वारे नियमित मोहीम राबविण्यात येणार आहे. यात भटक्या जनावरांना ताब्यात घेऊन शासकीय गोशाळेत ठेवण्यात येईल.

त्यानंतर मालकांची ओळख पटवून नियमांनुसार दंड वसूल केल्यानंतरच जनावरे त्यांच्या मालकांकडे सुपूर्द केली जातील.

जिल्हाधिकारी मित्तल यांनी नागरिकांनीही या उपक्रमात प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

रस्त्यावर जनावरे सोडणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्वच्छ, सुरक्षित आणि वाहतूक कोंडीमुक्त शहरासाठी सर्वांनी प्रशासनाला हातभार लावावा, अशी विनंतीही त्यांनी केली.

# अंबड नगरपरिषद निवडणुकीत राजकीय वादळ

## देवयानी केदार कुलकर्णींच्या प्रवेशानं विरोधकांचा समतोल ढासळला; शहरात 'बदलाच्या लाटेची' जोरदार चर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड प्रतिनिधी**/ अंबड नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टी-रासप महायुतीकडून देवयानी केदार कुलकर्णी यांची अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा होताच शहराच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. त्यांच्या पहिल्याच प्रचार सभांनी घेतलेला वेग आणि सादर केलेला विकासनामा पाहता विरोधक स्पष्टपणे बचावात्मक भूमिकेत गेलेले दिसत आहेत. शहरात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला सुरक्षा, रस्ते आणि रोजगाराच्या प्रश्नांवर विरोधकांनी केलेल्या 'दुर्लक्षाचा' उल्लेख करत देवयानी कुलकर्णी यांनी प्रहारांची मालिका सुरू केली आहे.

**जुने चेहरे, जुनी वचने अंबडला कुठेही नाही नेले ,**

**या वेळी जनता म्हणते - बदल आता ठरले!**

विरोधकांवर थेट हल्ला - 'अनेक वर्षांचा ठप्प कारभार' मुद्दा केंद्रस्थानी




देवयानी कुलकर्णी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शहरातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर विरोधकांनी केलेल्या दुर्लक्षामुळे सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. पाणीपुरवठ्याचा गोंधळ, वाढती अस्वच्छता, अंधारे रस्ते आणि महिलांसाठी वाढलेले असुरक्षित वातावरण - या सर्व मुद्द्यांवर विरोधकांनी फक्त आश्वासने दिली, मात्र प्रत्यक्षात काम शून्य असल्याचा आरोप त्यांनी केला. त्या म्हणाल्या, अंबडला मागे नेणाऱ्यांना जनता आता पुढचा मार्ग दाखवणार. विकास हा भीक नाही - नागरिकांचा अधिकार आहे आणि तो आम्ही प्रामाणिकपणे पूर्ण करणार आहोत.

**महिला व युवकांचा वाढता पाठिंबा - प्रचारात नवीन ऊर्जा**

देवयानींच्या सभांमध्ये महिलांची लक्षणीय उपस्थिती दिसत असून, महिला सुरक्षेबाबत त्यांचा ठाम दृष्टिकोन त्यामुळे जनतेशी थेट जोडला जात आहे. शहरात सीसीटीव्ही नेटवर्क, प्रकाश व्यवस्था सुधारणा आणि महिला संरक्षणासाठी विशेष योजना - या मुद्द्यांवर त्यांनी जोरदार भूमिका मांडली.

युवकांकडूनही त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. रोजगाराच्या संधी, व्यापार संकुल, क्रीडा सुविधा आणि आधुनिक शहरी विकासाची योजना - या बाबतीत देवयानी कुलकर्णी यांनी स्पष्ट आणि ठोस भूमिका मांडली आहे. एक युवकाने सभेत व्यक्त केलेली भावना शेरात मांडली गेली- संधी जुनी दिली, पण शहराचं काहीच बदललं नाही, या वेळच्या निवडणुकीत बदलाच्या नावाची हाक - देवयानीच ठरते योग्य ठरावी!

विकासाचा विस्तृत रोडमॅप - स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक अंबडचे आश्वासन

देवयानी कुलकर्णी यांनी जाहीर केलेल्या वचननाम्यात पाणीपुरवठा हा प्रमुख मुद्दा असून १० टीएमसी आरक्षित पाणी, नवीन पाणीपुरवठा योजना आणि डावरगावची जुनी योजना पुन्हा सुरू करण्याच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.

तसेच, सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता सुधारणा , सुलभ शौचालयांच्या उभारणीला प्राधान्य , शहरातील मुख्य रस्ते, चौकांना उउढत कवच नवनिर्मित हरित झोन, नानानाणी पार्क, चिल्ड्रन्स पार्क . आधुनिक बाजारपेठेसाठी व्यापार संकुल या सुविधा नागरिकांच्या जीवनमानात मोठा बदल घडवणाऱ्या असल्याचे युतीच्या म्हणण्यात आले.

**निवडणुकीचे समीकरण बदलते - 'हवा एकतर्फी' असल्याची चर्चा**

राजकीय विश्लेषकांच्या मते, शहरातील सध्याचे वातावरण भाजप-रासप उमेदवारांच्या बाजूने झुकलेले दिसत आहे. देवयानी कुलकर्णी यांची आक्रमक प्रचारशैली, स्पष्ट विकासनामा आणि विरोधकांच्या कामगिरीवर केलेली निर्भीड टीका यांनी निवडणुकीची दिशा बदलताना दिसत आहे.

अंधार कितीही जिद्दी असो , उजेड थांबत नाही ,

अंबडच्या नगराध्यक्षपदावर - या वेळचं नाव ठाम देवयानीच थांबत नाही !

## इस्राईल देशात बांधकाम नूतनीकरण क्षेत्रात रोजगाराची संधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमापैकी एक असलेल्या इस्राईल आणि भारत यांच्यातील कराराद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करणे या अंतर्गत इस्राईल देशात प्लास्टरिंग काम १००० जागा, सिरेमिक टायलींग १०००जागा, ड्रायवॉल वर्कर ३०० जागा व मिस्त्रीकामासाठी ३०० जागा असे एकूण २६०० कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आलेली आहे. यासाठी उमेदवार २५ ते ५० वयोगटातील दहावी पास पात्रताधारक उमेदवारांना इस्राईलमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. यासाठी बांधकाम क्षेत्रात काम करण्यास इच्छुक उमेदवारांनी https://tinyurl.com/6dp6cbs6 या गूगल फॉर्म लिंकवर उमेदवारांनी नोंदणी करावी. यासाठी अधिक सहाय्य व माहीतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, दुसरा माळा, जालना या कार्यालयाशी प्रत्यक्ष ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा किंवा कार्यालयाच्या jalnarojgargmail.com या ई-मेलवर संपर्क करावा, असे सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले केले.


## भारताचे संविधान कार्यक्रमाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ संविधान दिनानिमित्त दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी सहायक आयुक्त समाजकल्याण जालना या कार्यालयाच्या वतीने जालना येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात सकाळी ११ वाजता भारताचे संविधान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमापुर्वी सकाळी १० वाजता संविधान जागृकता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली मंठा चौफुली येथून सुरुवात होवून मस्तगड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येईल. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन समाजकल्याणचे सहायक आ युक्त राजु एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## पिशोर येथील दामु गव्हाणे यांचे निधन

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी /सुनिल निकम**/ कन्नड तालुक्यातील पिशोर येथील कै. दामु रावजी गव्हाणे (वय ६१) यांचे मंगळवारी दुपारी



१ वाजता दुःखद निधन झाले. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनानंतर सायंकाळी पाच वाजता पिशोर येथील स्मशानभूमीत त्यांच्या अंत्यसंस्कारास उपस्थितांच्या शोककळा दाटून आल्या. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार असून ते किशोर गव्हाणे आणि अक्षय गव्हाणे यांचे वडील होत.

# एकता पदयात्रेस जालनेकरांचा उत्स्फूर्त सहभाग

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त जालना शहरात मंगळवार दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य एकता पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारत माता की जय, वंदे मातरम या देशभक्तीपर घोषणांनी शहर दुमदुमुन गेले.

कार्यक्रम जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व माय भारत, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, तहसीलदार छाया पवार, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे केशव गिरडकर, सुरेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. तसेच पदयात्रेमध्ये एन.एस.एस, मॉडेल कॉलेज घनसावंगी, निर्मल क्रीडा मंडळ, विविध संस्था, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ म्हणाले की, सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारतासाठी 'एकता' हा मूलभूत मंत्र प्रत्येक जनमानसात दृढ रुजला पाहिजे. देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी विद्यार्थ्यांनी मानसिक, शारीरिक व भावनिकदृष्ट्या सक्षम राहून परिश्रमाची तयारी ठेवावी. सरदार पटेल यांच्या जिद्द, नेतृत्वगुण आणि कार्यतत्परतेचा आदर्श सर्वांनी घ्यावा.

कार्यक्रमात उत्कर्ष थिएटर कलापथक यांच्याकडून नशामुक्ती विषयावरील पथनाट्य, तसेच देशभक्तीपर गीते सादर करण्यात आले. नशाविरोधी संदेश देणाऱ्या या पथनाट्यास उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला सुरुवात झाली. पदयात्रा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते उडपी हॉटेल मार्गे फुल बाजार ते वीर सावरकर चौकापासून मामा चौक अशी मार्गस्थ होवून राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोमनाथ खाडे, प्रा. उद्धव थोरवे, जयपाल राठोड, अभिजित भुतेकर व पोलीस प्रशिक्षण केंद्राचे कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत 'लोहपुरुष' कैलास झोळगे यांची सुवर्णझेप




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) यांच्या वतीने दिनांक २१ ते २३ नोव्हेंबरदरम्यान हैदराबाद येथील जी.एम.सी. बालयोगी गच्चीबोली आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये पार पडलेल्या २१ व्या मास्टर्स राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत जालन्याचे अष्टपैलू जलतरणपटू व प्रशिक्षक कैलास गजाननराव झोळगे यांनी दैदिप्यमान कामगिरी करत १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली आहे.

या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह दिल्ली, पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, मनिपूर, गुजरात, ओडिशा, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश, चंदिगड अशा देशभरातील ३० राज्यांमधील १२०० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरणपटू सहभागी झाले होते. अशा अत्यंत तीव्र स्पर्धात्मक वातावरणात झोळगे यांनी अप्रतिम प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावून जालना जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकावले .

यापूर्वी महिनाभरापूर्वीच जगातील कठीणतम स्पर्धांपैकी एक मानल्या जाणाऱ्या 'हाफ आयर्नमॅन २०२५' मध्ये अभूतपूर्व कामगिरी करत त्यांनी लोहपुरुष हा बहुमान मिळवला होता. त्यामुळे ते जालन्याचे पहिले आयर्नमॅन ठरले आहेत. त्यांच्या सततच्या संघर्षातून आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणातून मिळवलेल्या या यशामुळे जालना शहराचा क्रीडाअभिमान आणखी उंचावला आहे.

कैलास झोळगे यांच्या या शानदार यशाबद्दल विविध क्रीडा संस्था, क्रीडाप्रेमी नागरिक, विद्यार्थी, माजी जलतरणपटू व मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सिद्धनाथ वाडगाव येथे बांधकाम कामगार यांची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा**/ मंगळवार रोजी सिद्धनाथ वाडगाव येथे बांधकाम कामगार यांच्या आरोग्य तपासणीच्या कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.



तसेच मागील महिन्यात ज्या कामगारांनी आरोग्य तपासणी केली होती त्यांना सर्व प्रकारचे मेडिकल मोफत वाटप करण्यात आले. या आरोग्य तपासणी मध्ये २०० पेक्षा जास्त कामगारांनी सहभाग नोंदवला. सिद्धनाथ वाडगाव व परिसरातील सर्वच बांधकाम कामगार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून कामगार संघटना जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील चव्हाण, ग्राम संवाद सरपंच संघटना प्रदेश सचिव विशाल पाटील लांडगे माजी सभापती महेंद्र पाटील गंडे होते. तर कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते राजू बारवाल यांनी केले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813